# १५. आनंदाचं झाड

काकू म्हणाल्या, ''अहो, लोक शेंगा तोडून नेतील, तेव्हा नाही का भांडणार तुम्ही ?''

आई म्हणाली, ''नेऊ देत नेल्या तर. खाण्याचीच वस्तू ती. झाडांना त्या शेंगा फक्त आमच्यासाठीच नाही लागल्या. झाडाला शेंगा असेपर्यंत लोकांचं लक्ष झाडाकडे जाणारच.''

हिरव्यागार पसरलेल्या फांद्यांवर रंगीबेरंगी पक्ष्यांचा अखंड मेळा भरत होता. आमचा शेवगा म्हणजे माझ्यासाठी निसर्गाचा अनमोल ठेवा.

या शेवग्यामुळेच मला विविध पक्ष्यांची अगदी जवळून ओळख झाली. त्या पक्ष्यांचे विविध आकार; देखणे, मोहक रंग; लयदार लकबी, गोड आवाज, त्यांच्या मजेदार हालचाली, त्यांची दिनचर्या इत्यादी कळली.

आमच्या शेवग्याच्या पांढऱ्याशुभ्र फुलांच्या घोसांवर रुंजी घालत गुंजारव करणाऱ्या जांभळट-काळ्या टपोऱ्या भुंग्याची व माझी भेट झाली. फुलांमधला मध पिऊन फुलांभोवती नाचणाऱ्या मधमाश्या मी पाहिल्या शेवग्यामुळे. अलगत हवेत तरंगत इवल्या इवल्या चपळ फुलचुख्यांची झुंबड मला दिसली. मधानं गच्च भरलेल्या फुलांतून हवेत अलगत मध चोखण्याची कला पाहावी ती फुलचुख्यांची. इटुकला बोटभर फुलचुख्या असतो मात्र कसरतपटू. एरवी मला कधीच दिसला नसता, फक्त आवाजच ऐकून होते, तो तांबट पक्षी मनमुरादपणे मान खाली-वर करत, अगदी एकाग्रतेनं तुक्तुक् आवाजाचा टणत्कार करताना मला चक्क दिसला. भर उन्हात शेवग्याच्या उंच उंच फांदीच्या शेंड्यावर कोकीळ पक्षीही शांतपणे झुलताना मी पाहिला. छोटे छोटे हिरव्या राघूंचे थवेच्या थवे अलगत उडत उडत, हवेत तरंगत कधी किडे तर कधी परागकेशरांचा फन्ना उडवताना पाहिलं.

राघू हवेत तरंगत शिकार करण्यात अगदीच पटाईत. सर्व ऋतूंमध्ये विविध पशु-पक्षी, कीटक-किड्यांचं 'आमचा शेवगा' हे माहेर बनलं होतं. वाळलेल्या शेंगांच्या बियांच्या मेजवानीसाठी पोपटांची नियमित हजेरी लागे. पोपटांचा हिरवागार रंग, लांबसडक शेपूट अन् नखरेबाज हालचाल मी अगदी जवळून पाहिली. बुलबुल पक्ष्याच्या सुरेल ताना मी आमच्या शेवग्यामुळेच ऐकू शकले. चिमण्यांची अखंड चिवचिव अन् साळुंक्यांची एकसारखी किलकिल, अगदी कान किट्ट करणारी, मी जवळून ऐकली. हिवाळ्यात तर खंड्या नियमित हजेरी लावू लागला. एरवी मी खंड्याला चित्रातच पाहिलं होतं. खंड्याचा तो देखणा मोरपंखी निळा रंग अन् रूप, बाकदार मोठी चोच, त्याची एकाग्रता अन् किलकिल आवाज करत सुळकी मारण्याची कला मला दाखवली, ती शेवग्यानं.

**वाचा व प्रश्न तयार करा.**

**टेस्ट सोडवा.**

ऑनलाईन टेस्ट

विभाग दुसरा

## ९. शाब्दिक उदाहरणे : बेरीज – वजाबाकी

स्वाध्याय

१. रोहनने संगणक खरेदीसाठी २७,६५८ रुपये आणि प्रिंटर, स्कॅनर यांसाठी १६,४७८ रुपये खर्च केले. या साहित्याची बांधाबांध, वाहतूक यांसाठी काही खर्च झाला. रोहनला एकूण ४७,००० रुपये खर्च आला, तर त्याने बांधाबांध व वाहतुकीसाठी किती खर्च केला ?

२. एका रोपवाटिकेत ३२,१४० रोपे तयार करण्यात आली. त्यांपैकी १२,७८९ आंब्याची रोपे, १०,४२३ सागवानाची रोपे व बाकीची इतर प्रकारची रोपे होती, तर इतर प्रकारची रोपे किती होती ?

३. एका खेळाच्या मैदानाची आसनक्षमता २०,७५० आहे. एका सामन्याच्या वेळी ८,५०० स्त्रिया व ११,२०० पुरुष हजर होते, तर किती आसने रिकामी होती ?

४. रामभाऊंजवळ १५,००० रुपये होते. त्यांनी ८,५७० रुपयांचा कडबा व ४,९५० रुपयांचे पशुखाद्य खरेदी केले, तर त्यांच्याजवळ किती रुपये उरले ?

५. ललिताबेन यांनी एका हॉस्पिटलला ७५,००० रुपये देणगी दिली. त्यातून ४७,५०० रुपयांची उपकरणे आणि १८,२४० रुपयांची औषधे खरेदी केली, तर किती रक्कम शिल्लक राहिली ?

**नवीन टेस्ट सोडवा.**

ऑनलाईन टेस्ट



## 9. Word Problems: Addition and Subtraction

Exercise

(1) Rohan spent ₹ 27,658 for purchasing computers and ₹ 16,478 on a printer and scanner. Packing and transporting the goods cost extra. Rohan spent a total of ₹ 47,000. How much did he spend on packing and transport?

(2) In a nursery, there were 32,140 saplings. 12,789 were mango saplings and 10,423 were teak saplings. How many other saplings were there?

(3) The seating capacity of a playground is 20,750. If there were 8,500 women and 11,200 men present for a function, how many seats remained vacant?

(4) Rambhau had ₹ 15,000. He bought fodder worth ₹ 8,570 and other animal feed worth ₹ 4,950. How much money did he have left?

(5) Lalitaben donated ₹ 75,000 to a hospital. ₹ 47,500 were used for equipment and ₹ 18,240 were used for medicines. How much money still remains?

**Read and understand.**



**read and understand.**

Maya began to walk with
her head held high.
She moved her head slowly
from side to side.
The milk in her pot
rolled gently.
Maya went on dreaming –

'When Meera sees
my rings,
she will get a surprise.

She will say,
"Oh, what lovely rings!
Wait, Maya, wait!
I want to see your rings!"



But will I wait? Oh, no!
Why should I? Does she ever wait for me?
No.
I will just toss my head like this –'
Maya tossed her head (with a jerk).

And what's this ?

Away flew the pot of milk.
Out spilled the milk!

No milk - no *dahi* - no butter -
no earrings!
Maya lost her earrings
even before she bought them.



**2. Guess the meaning of the following words.** या शब्दांचे अर्थ अंदाजाने सांगा.

* milkmaid  * churn  * jerk  * spilled


**3. Write the steps in Maya's dream from 'milk to earrings'.**

**4. Choose any 3-4 lines from the story and enact them.**

# १४. नकाशा आणि खुणा

## सांगा पाहू

खाली दिलेल्या महाराष्ट्राच्या नकाशाचे निरीक्षण करून कृती करा.




(१) आपल्या राज्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. महाराष्ट्रात जलदुर्ग (सागरी किल्ला) गिरिदुर्ग (डोंगरी किल्ला) व भुईकोट (मैदानी किल्ला) असे किल्ले आहेत. किल्ले असलेल्या जिल्ह्यांची नावे वहीत नोंदवा.

(२) गरम पाण्याचे झरे कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये आहेत, ते वहीत लिहा.

(३) आपल्या राज्यात ज्या जिल्ह्यांमध्ये लेणी आहेत, त्या जिल्ह्यांची नावे अधोरेखित करा.

(४) नकाशातील बंदर असणारे जिल्हे शोधा व त्यांच्या नावांभोवती ◯ अशी खूण करा.

(५) सूचीतील माहितीचा वापर करून मानवनिर्मित व नैसर्गिक घटकांची वर्गवारी करा.

(६) पुणे–कोल्हापूर शहरांदरम्यान राष्ट्रीय महामार्ग व लोहमार्ग आहेत. यांपैकी कोणता मार्ग कमी अंतराचा आहे, ते वहीत लिहा.

(७) गोंदिया–चंद्रपूर लोहमार्ग गिरवा व त्यावरील स्थानके वहीत नोंदवा.

**वाचा व समजून घ्या.**

ऑनलाईन टेस्ट

# १३. बादशाहाच्या हातावर तुरी दिल्या

जयसिंगाच्या शब्दावर विश्वास ठेवून शिवराय बादशाहाच्या भेटीस आग्र्याला जाण्यास निघाले. जाण्यापूर्वी शिवरायांनी स्वराज्याचा कारभार जिजामातेच्या हाती सोपवला आणि त्यांचा आशीर्वाद घेतला. बरोबर आपले पुत्र संभाजीराजे, निवडक सरदार, काही विश्वासू माणसे आणि बराच खजिना घेतला. मजल दरमजल करत ते आग्र्यास पोहोचले.

**दरबारातील बाणेदारपणा :** ठरल्याप्रमाणे शिवराय बादशाहाच्या दरबारास गेले. छोटे संभाजीराजे सोबत होते. त्या दिवशी औरंगजेब बादशाहाचा पन्नासावा वाढदिवस होता. बादशाहा दरबार संपवून सल्लामसलतीच्या महालात गेला. त्याच्या समोर निवडक सरदार मानाप्रमाणे आपापल्या रांगेत उभे होते. बादशाहाने शिवरायांना मागील रांगेत उभे केले. मराठ्यांना अनेक वेळा पाठ दाखवून पळालेला जसवंतसिंग राठोड शिवरायांच्या पुढील रांगेत होता. शिवरायांना वाटले, ‘आपण महाराष्ट्राचे राजे, आपला मान पहिल्या रांगेत राहण्याचा,



बादशाहाच्या दरबारात–शिवराय

पण बादशाहाने आपल्याला मागील रांगेत उभे करावे म्हणजे काय?' त्यांचे डोळे रागाने लाल झाले. हा अपमान त्यांना सहन झाला नाही. रागारागाने शिवराय महालाबाहेर पडले. ते तडक आपल्या मुक्कामावर गेले. यापुढे बादशाहाचे तोंड पाहायचे नाही, असे त्यांनी ठरवले.

भेटीचा बेत असा बिनसला. घडलेल्या प्रसंगाची हकीकत सगळीकडे पसरली.

**सराव करा व प्रश्न बनवा. या पाठावरील टेस्ट ब्लॉगवर पहा.**

**माझा ऑनलाईन अभ्यास – सराव चाचणी**

| इयत्ता चौथी - मराठी | महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर |
|---|---|
| 14. मिठाचा शोध | Click Here |
| 15. आनंदाचं झाड | Click Here |
| 16. झुळूक मी व्हावे | Click Here |
| 17. म्हणींच्या गमती | Click Here |
| धरतीची आम्ही लेकरं mp3 | Click Here |
| या भारतात बंधुभाव mp3 | Click Here |
| धूळपेरणी mp3 | Click Here |
| नाखवादादा mp3 | Click Here |
| चवदार तळ्याचे पाणी mp3 | Click Here |
| झुळूक मी व्हावे mp3 | Click Here |

| | |
|---|---|
| हें कोण गे आई mp3 | Click Here |
| आभाळमाया mp3 | Click Here |
| मन्हा खान्देस्नी माटी mp3 | Click Here |
| **इयत्ता चौथी - गणित** | **महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर** |
| शाब्दिक उदाहरणे-बेरीज | Click Here |
| शाब्दिक उदाहरणे-वजाबाकी | Click Here |
| अपूर्णांक | लवकरच |
| मापन | लवकरच |
| **इयत्ता चौथी - परिसर अभ्यास - 1** | **महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर** |
| 14 नकाशा आणि खुणा | Click Here |
| 15. माझा जिल्हा माझे राज्य | लवकरच |
| 16. दिवस व रात्र | लवकरच |
| 17. माझी जडणघडण | लवकरच |
| **इयत्ता चौथी - परिसर अभ्यास - 2** | **महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर** |
| 12. पुरंदरचा वेढा व तह | Click Here |
| 13. बादशाहाच्या हातावर तुरी दिल्या | लवकरच |
| 14. गड आला पण सिंह गेला | लवकरच |